स्वामी दत्तावधूत विरचित

# श्रीदत्तलीलामृत

आणि

# श्रीसिद्धलीलामृत

# श्रीदत्तलीलामृत-श्रीसिद्धलीलामृत

आवृत्ती पहिली : १९९९ आवृत्ती पंधरावी : २०२३

● प्रकाशक ●

ॐ वनिता बुक्स

बी - २१३ सात आसरा सहकारी गृहनिर्माण संस्था (पानवाला चाळ),
डॉ. एस. एस. राव मार्ग, लालबाग, मुंबई - ४०० ०१२. दूरध्वनी - (०२२) २४१८७३३९

Visit: www.omvanitabooks.com

© या ग्रंथाचे सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन

मूल्य : रु. ५०/-

## प्रास्ताविक

**श्रीदत्तलीलामृत – एक सिद्धग्रंथ...! दत्तभक्तांसाठी श्रीदत्तप्रभूंचे एक वरदान...!**

आजकालच्या धावपळीच्या जीवनामध्ये श्रीगुरुचरित्र, श्रीगुरुलीलामृत यासारखे मोठे ग्रंथ वाचणे सद्भक्तांना गैरसोईचे होत आहे. वाचायची इच्छा आहे; परंतु रजा मिळत नाही, वेळ मिळत नाही, अशा अनेक अडचणींमुळे मोठे ग्रंथ वाचणे सद्भक्तांना शक्य होत नाही आणि म्हणूनच श्री स्वामी समर्थांनी श्री स्वामी दत्तावधूतांना हा छोटासा ग्रंथ लिहिण्याची आज्ञा केली. श्री स्वामी दत्तावधूतांनी पाच अध्याय लिहिले. या १ ते ५ अध्यायांत श्री श्रीपाद श्रीवल्लभ, श्री स्वामी नृसिंह सरस्वती व श्री अक्कलकोट स्वामी यांचे संक्षिप्त चरित्र वर्णन केले. येथे ग्रंथ समाप्त केला होता; परंतु श्री स्वामी समर्थांनी स्वप्नात येऊन ग्रंथ पुढे लिहिण्याची आज्ञा केली व श्री स्वामी चिदंबर दीक्षित, श्री महासिद्ध अल्लमप्रभू व श्री ब्रह्मेंद्रस्वामी यांची संक्षिप्त चरित्रे लिहिण्यास सांगितले, त्यामुळे हा ग्रंथ नऊ अध्यायांचा झाला आहे. त्याचबरोबर हा ग्रंथ केवळ दत्तभक्तांसाठीच न राहता इतर सर्व सांप्रदायिकांना तसेच इतर धर्मांतील सद्भक्तांनाही उपयुक्त ठरणार आहे. अतएव ही अमृताची आरवंटी समस्त मानव समाजाला सन्मार्गाने पुढे नेत राहील व ईश्वराची कृपा प्राप्त करून देईल, अशी आमची श्रद्धा आहे. या उपासनेस सुरुवात केल्यानंतर सात्विकतेने वागावे, कोणाची मने दुखवू नयेत, सर्वांशी प्रेमाने वागावे, समाजातील कुप्रथा (हुंडा घेणे, बळी देणे इत्यादी) सोडून द्याव्यात, परोपकार व दानधर्म करावा व सर्वांचे आशीर्वाद घ्यावेत. ईश्वरभक्ती करून मिळविलेले पुण्य टिकविण्याची ही खरी गुरुकिल्ली आहे.

**– प्रकाशक**

# द्वितीय आवृत्तीची प्रस्तावना

श्रीदत्तलीलामृत व श्रीसिद्धलीलामृत या दोन छोट्याशा पोथ्या श्री स्वामी दत्तावधूतांनी लिहून प्रकाशनार्थ माझ्याकडे पाठविल्या व निरोप दिला...

'जे कोणी या पोथ्या वाचतील त्यांच्या मनोकामना पूर्ण होतील. याशिवाय वाचणाऱ्यांच्या आई-वडिलांनाही पुण्य मिळेल व पितरांचाही उद्धार होईल, तसेच मृतात्म्यांनाही सद्‌गती मिळेल !'

श्रीस्वामीजींनी वरील निरोप देऊन जवळजवळ दहा-बारा वर्षे झाली. आजतागायत मी ही गोष्ट कोणालाही सांगितलेली नाही. परंतु ज्यांनी ज्यांनी श्रीदत्तलीलामृत व श्रीसिद्धलीलामृत वाचले त्यातील अनेकांनी मला पुढीलप्रमाणे निरोप दिले..

''या पोथ्या वाचल्याने अनेक वर्षे अंथरुणावर खिळलेल्या आमच्या आजीची सुटका झाली. तसेच पोथ्या वाचल्याने पितरांना सद्‌गती मिळते, आई-वडिलांना आरोग्य लाभते, असा अनुभव भक्तांना आलेला आहे.''

कॅनडाहून डॉ. मेघल कळवितात, ''भारतामध्ये ज्या ज्यावेळी माझी आई आजारी असते तेव्हा मी कॅनडामध्ये श्रीदत्तलीलामृत व श्रीसिद्धलीलामृत या दोन्ही पोथ्या वाचनात ठेवते व त्या पोथ्या वाचल्यानंतर आईच्या प्रकृतीला आराम पडतो, असा माझा अनुभव आहे.''

**१५ ऑगस्ट २००६, गोकुळअष्टमी** **– प्रकाशक**

# पूर्वजांचा उद्धार

श्रीदत्तलीलामृत व श्रीसिद्धलीलामृत या छोट्याशा ग्रंथाच्या वाचनाने पूर्वजांना सद्‌गती प्राप्त होते. असा अनेक भक्तांचा अनुभव आहे. या विषयी आम्हाला नुकताच एक नवीन अनुभव कळला, तो पुढे देत आहोत.

सॅनफ्रान्सिस्को (अमेरिका) येथील सुजाता प्रवीण माळवे यांनी आपला अनुभव आम्हाला पुढील प्रमाणे कळविला आहे.

'सॅनफ्रान्सिस्को येथे आमचे सॅन्डविचचे दुकान आहे. घरात तसेच दुकानातही आम्हाला शांती नव्हती. कुठल्याही मार्गाने प्रगती होत नव्हती. अनेक समस्या व अडचणींना आम्ही तोंड देत होतो. पूर्वजांना सद्‌गती प्राप्त न झाल्या कारणाने या सर्व अडचणी येत आहेत, असे आम्हाला एकाने सांगितले होते.

देवाधर्माचे आम्ही करत होतो, पोथ्या वगैरे वाचत होतो. परंतु काही फरक पडत नव्हता. प्रवीण माळवे एकदा अमेरिकेहून नाशिकला आला. नाशिकला त्याचे घर आहे. तेथील एका ज्योतिषाने प्रवीणला सांगितले, की श्री स्वामी दत्तावधूत यांनी लिहिलेली सर्व पुस्तके व पोथ्या विकत घेऊन नुसती घरात ठेवली तरी सुद्धा खूप फरक पडेल. पुस्तके वाचून त्याप्रमाणे थोडे फार आचरण केल्यास संपूर्ण जीवन बदलून जाईल. त्यांनी लिहिलेल्या पोथ्यांमध्ये श्रीदत्तलीलामृत व श्रीसिद्धलीलामृत या पोथीच्या वाचनाने पूर्वजांचा उद्धार होतो.'

ज्योतिषाने सांगितल्याप्रमाणे प्रवीण माळवे याने सर्व पुस्तके विकत घेतली व अमेरिकेला गेला. पुस्तके घरात ठेवल्याबरोबर घरातील व दुकानातील वातावरणात फरक पडल्याचे प्रवीण व सुजाताला जाणवले.

सुजाताने लगेच पुस्तके वाचायला घेतली. तसेच श्रीदत्तलीलामृत व श्रीसिद्धलीलामृत ही पोथी दररोज वाचायला सुरुवात केली.

पोथी वाचायला सुरुवात केल्यानंतर काही दिवसांनी सुजाता माळवे हिला स्वप्न पडले.

स्वप्नामध्ये तीस वर्षांपूर्वी मृत्यू पावलेली तिची आई तिच्या स्वप्नात आली व म्हणाली, ''तू जे काही देवाचे करतेस त्यामुळे माझी तीस वर्षांनी कैदेतून सुटका झाली. माझा उद्धार झाला !'' आणखी काही दिवस वाचन केल्यानंतर आजीनेही आपल्याला सद्गती मिळाल्याचे स्वप्नात येऊन सांगितले. सुजाताची सासू नाशिक येथे रहात होती. एकदा तिने सुजाताला फोनवर सांगितले, 'मी खूप अस्वस्थ आहे, मनावर खूप दडपण आहे.' त्यावर सुजाता म्हणाली, 'ठीक आहे ! मी तुमच्यासाठी ईश्वराला प्रार्थना करते.'

सुजाताने आपल्या सासूच्या नावाने श्रीदत्तलीलामृत- श्रीसिद्धलीलामृत पोथी वाचायला सुरुवात केली. पंधरा-वीस दिवसातच सासूच्या मनावरील सर्व दडपण दूर झाल्याचे व मनाला शांती प्राप्त झाल्याचे सासूने फोनवर सांगितले.

**श्री दत्त जयंती, १२ डिसेंबर २००८** **- प्रकाशक**

# चौदाव्या आवृत्तीची प्रस्तावना

श्रीदत्तलीलामृत–श्रीसिद्धलीलामृत या पोथीची ही चौदावी आवृत्ती वाचकांच्या हाती देतांना आम्ही काय सांगावे हाच प्रश्न आमच्या समोर पडला आहे, म्हणून वाचकांनीच जे अनुभवाचे उद्‌गार आम्हाला पत्राद्वारे कळविले ते वाचकांचे उद्‌गारच आम्ही प्रस्तावनेत मांडत आहोत.

''नारायण नागबली केला, त्रिपिंडी श्राद्ध केले. हे सर्व करण्यात चाळीस हजाराहून अधिक खर्च झाला. पण पूर्वजांना मुक्ती मिळाली नाही. शेवटी एका ज्योतिषाने आम्हाला ही पोथी वाचावयास दिली. पोथी वाचल्यानंतर, पूर्वजांना शांती व सद्‌गति प्राप्त झाली आणि आम्ही सुखी झालो.''

अनेक ज्योतिषांनी आता **श्रीस्वामी दत्तावधूत** यांनी लिहिलेल्या पोथ्या जवळ ठेवल्या असून, प्रश्नकर्त्यांना ते पोथ्या वाचावयास सांगतात. अन्य उपाय त्रिपिंडी श्राद्ध, नारायण नागबली, कालसर्पदोष निवारण, असे खर्चिक उपाय सांगणे बंद केले आहे.

आज एक लाखाहून अधिक घरांमध्ये श्रीदत्तलीलामृत–श्रीसिद्धलीलामृत पोथी वाचली जात आहे. ग्रहशांती–वास्तुशांती, वास्तुदोष निवारण, यासाठीसुद्धा या पोथीचा उपयोग होतो, असे अनुभवास आले आहे. त्याच बरोबर हेही नमूद करावेसे वाटते की, ज्या लोकांची मने अशुद्ध आहेत, स्वार्थी व कपटी आहेत, नाटकी व अश्रद्ध आहेत अशा लोकांना या पोथ्यांचा काहीच अनुभव येत नाही.

**२५ ऑक्टोबर २०२०, दसरा** **– प्रकाशक**

# ।। अध्याय पहिला ।।

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुभ्यो नमः ।
बालार्कप्रभमिन्द्रनीलजटिलं भस्माङ्गरागोज्ज्वलं ।
शांतम् नाद विलीनचित्तपवनम् शार्दूलचर्माम्बरम् ।
ब्रह्मज्ञै सनकादिभिः परिवृतं सिद्धैः समाराधितम् ।
दत्तात्रेय मुपास्महे हृदि मुदा ध्येयं सदा योगिभिः ।।

अत्रि अनुसूया कारण । दत्तात्रेयाचे अवतरण । माहूरगडी राहून । अनंत लीला करीतसे ।। १ ।। यदु, अलर्क, परशुराम । कार्तवीर्य राजनन्दन । ऐसे शिष्य निर्माण । केले पाहा श्रीगुरुने ।। २ ।। ॐ द्राम् ॐ बीजमंत्र । पठणे प्रकटे श्रीदत्त । ऐसे माहात्म्य अद्‌भुत । श्रीदत्ताचे आहे हो ।। ३ ।। अवतार येती आणि जाती । तैसी नोहे दत्तमूर्ती । सदा राहे पृथ्वीवरती । लोकोद्धार करावया ।। ४ ।। करावया

जगदुद्धार। स्वये कष्टे विश्वंभर । श्रीदत्तात्रेय अवतार । विविध रूपे राहतसे ॥ ५ ॥ अनेक रूपे घेवोनी । श्रीदत्त संचरती जनी । जना सन्मार्ग दावोनी । मोक्षमार्गा लावीतसे ॥ ६ ॥ त्याची रूपे अनंत । झाली असती पुढे होत । त्यातील काही येथ प्रत । त्याचे कृपे वर्णितो ॥ ७ ॥ पीठापूर ग्रामात । श्रीपाद श्रीवल्लभ अवतरत । श्रीदत्ताचा असत। मुख्य अवतार पूर्ण हा ॥ ८ ॥ कुरवपुरी येवोनी राहत । रजकाते वरदान देत । म्हणती सुखी नराधिप । पुढील जन्मात होई तू ॥ ९ ॥ तैसेचि एका स्त्रियेप्रत । वरदान श्री स्वामी देत । पुढील माझ्या अवतारात । पुत्र होईन मी तुझा ॥ १० ॥ श्रीपाद श्रीवल्लभ । करुणासागर समर्थ । अत्रि अनुसूयेचा दत्त । नाना लीला दावीतसे ॥ ११ ॥ उद्धारावया भक्तांप्रत । अवतार घेती श्रीदत्त। पुन्हा पुन्हा प्रकट होत। पृथ्वीमाजी अवधारा ॥ १२ ॥ एकाच समयी अनेक स्थानी । अवतार घेती दत्तमुनी । जना सन्मार्ग दावोनी । स्वये गुप्त राहती ते ॥ १३ ॥ श्रीपाद श्रीवल्लभ अवतारात । लीला श्रींनी केल्या अनंत । त्या सर्व श्री गुरुचरित्रात । वर्णिल्या मनोहर असती हो ॥ १४ ॥ श्रीपाद श्रीवल्लभ स्मरण । येथे फक्त केले आपण । श्री गुरुचरणी नमोन । संक्षिप्त सारे पाहतसो ॥ १५ ॥ ॐ दिगंबरा ॐ दिगंबरा ।

श्रीपादवल्लभ दिगंबरा । या मंत्रजपाते तत्परा । मनामाजी ठेवावे ।। १६ ।। हेचि करिता साधन । श्रीपाद श्रीवल्लभ दत्त प्रसन्न । होवोनी देई वरदान । सर्व सुखाचे भक्तासी ।। १७ ।। अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त । अवधूत निरंजन दत्त । हे मंत्र असती प्रसिद्ध । श्री दत्त प्रसन्न करण्याचे ।। १८ ।। ॐ द्राम् दत्तात्रेयाय नमः । ॐ नमो भगवते दत्तात्रेयाय । हेही मंत्र असती प्रसिद्ध । श्रीदत्त प्रसन्न करण्याचे ।। १९ ।। औदुंबरतळी बैसोनी । स्मरावे दत्तासी एक मनी । श्रीदत्तकृपा होवोनी । सुख संपन्नता लाभतसे ।। २० ।। श्रीदत्तलीलामृत । प्रथम अध्याय संपला येथ । श्री दत्तावधूत आपुले चित्त । श्रीदत्तचरणी वाहतसे ।। २१ ।।

।। अध्याय पहिला समाप्त ।।

(ओवी संख्या २१)



# ।। अध्याय दुसरा ।।

श्रीगणेशाय नमः । ॐ द्राम् दत्तात्रेयाय नमः ।। कुरवपुरी राहती श्रीदत्त । श्रीपाद श्रीवल्लभ समर्थ । अनेक लीला दावीत । भक्तोद्धाराकारणे ।।१।। ऐसी काही वर्षे जात । मग म्हणती भक्तांप्रत । आम्ही आता होऊ गुप्त । येथोनिया अवधारा ।।२।। होऊ येथूनी गुप्त । जावोनी राहू कर्दळीवनात । काही काळ तप करीत । राहू आम्ही तेथवरी ।। ३ ।। तद्नंतर पुन्हा परत । अवतार घेऊ महाराष्ट्रात । नृसिंह सरस्वती नामे प्रख्यात । होऊ आम्ही अवधारा ।। ४ ।। ऐसे सांगोनी भक्तांप्रत । कृष्णा नदीत होती गुप्त । श्रीशैल पर्वती प्रकटत । महास्वामी अवधारा ।। ५ ।। काही काळ राहोनी तेथ । कर्दळीवनी प्रवेशत । समाधी लावोनी बैसत । काही वर्षे तेथवरी ।। ६ ।। समाधिते विसर्जोनी । अवतार घेती श्रीपादमुनी । कारंजा ग्राम म्हणोनी । महाराष्ट्रात अवधारा ।। ७ ।। तेथे अवतार घेत । उपजता ॐ म्हणो लागत । लोक आश्चर्यचकित । म्हणती दिव्य बालक हे ।। ८ ।। न रडे न मागे काही । बालक ॐ म्हणत राही । सदा हास्य करीत राही । ॐ ऐसे म्हणोनिया ।। ९ ।।



मुंज होताच श्रीनृसिंहस्वामी सरस्वतींनी आपले जन्मापासूनचे मौन सोडले व वेदमंत्र म्हणू लागले.

दिवस रात्र ॐ म्हणत । ॐ ध्वनि गृही गुंजत । ॐ प्रकटला म्हणत । लोक विस्मये तेधवा ।। १० ।। ऐसी जाती वर्षे सात । बालक ॐ राहे म्हणत । परी न काही बोलत । चिंतित होती सर्वही ।। ११ ।। इतरे जन जे बोलत । ते सर्व कळे बालकाप्रत । परी प्रत्युत्तरी ॐ म्हणत । आणिक काही बोलेना ।। १२ ।। अंती पुसती तयासी । सांग तू केव्हा बोलसी । बालक खूण करोनी त्यासी । सांगतसे ते अवधारा ।। १३ ।। खूण करोनी दावीत । मौजीबंधन करा म्हणत । उपनयन होता त्वरित । बोलेन आपण म्हणतसे ।। १४ ।। ऐसे ऐकोनी मातापिता । मौजीबंधन तत्त्वता । करो म्हणती निश्चिता । तयारी करो लागले ।। १५।। सुमुहूर्त पाहोनी उपनयन । केले पाहा मौजीबंधन । बालक वेदमंत्र म्हणोन । निज मौनाते सोडीतसे ।। १६ ।। सर्वां आश्चर्य वाटत । बालक पाहा वर्षे सात । वेदमंत्र म्हणो लागत । अवतार म्हणती दत्ताचा ।। १७ ।। तव नृसिंह सरस्वती । म्हणती सर्व लोकांप्रती । आम्ही संन्यासी असो यती । गृही न राहू निश्चये ।।१८ ।। ऐसे सांगोनी सर्वांप्रत । निघाले स्वामी हिमालयात । तेथे तप आचरीत । लोकोद्धाराकारणे ।। १९ ।। तेथूनिया पुन्हा परत । तीर्थयात्रा करीत करीत । औदुंबर स्थान जेथ । तेथे येऊनी राहिले ।। २० ।। भिलवडी

ग्रामा समिपत । औदुंबर स्थान प्रख्यात । आज जाहले असत । दत्तस्थान म्हणोनिया ।। २१ ।। चार मास राहती तेथ । शक्ती ठेविती अमूप । पादुका तेथे स्थापित । जगदोद्धाराकारणे ।। २२ ।। ते औदुंबर पादुकास्थान । आज प्रख्यात दत्तस्थान । मनोकामना होती पूर्ण । ऐसे तीर्थस्थान ते ।। २३ ।। तेथूनी स्वामी मग निघती । नृसिंहवाडी स्थानी जाती । द्वादश वर्षे राहती । तप करिती ते देखा ।। २४ ।। श्रीदत्तलीलामृत दिव्य ग्रंथ । पठणे पुरती मनोरथ । दत्तावधूत संक्षिप्त । दत्तलीला सांगतसे ।। २५ ।।

।। अध्याय दुसरा समाप्त ।।

(ओवी संख्या २५)



श्रीनृसिंहस्वामी सरस्वती

# ।। अध्याय तिसरा ।।

श्रीगणेशाय नम: । दत्तात्रेयो हरिकृष्णो । मुकुंदो आनंददायक: । मुनी दिगंबरो बालो । सर्वज्ञो ज्ञानसागर: ।।१ ।। श्रीनृसिंह सरस्वती । अमरापूर ग्रामा येती । कृष्णा नदीकिनारी राहती । औदुंबरतळी देखा ।।२।। द्वादश वर्षे तेथे राहत । लोकोद्धारा तप करीत । अनेक लीला दावीत । भक्तरक्षणा कारणे ।।३।। नृसिंहवाडी म्हणोन । आज प्रसिद्ध ते स्थान । सहस्त्रावधी भक्तजन । नित्य जाती दर्शना ।।४।। मनोहर पादुका असत। जलयोगिनी सेवा करीत। देवदेवता पुजीत । ऐसे महास्थान ते ।। ५।। जगदोद्धाराकारण । नृसिंह सरस्वती दत्त आपण । विविध लीला दाखवोन । मनोरथ पुरविती भक्तांचे ।।६।। अनेक लीला तेथे केल्या । आहेत गुरुचरित्री वर्णिल्या । महासिद्ध स्थान ये वेळा । नृसिंहवाडी आहे हो ।। ७ ।। संक्षिप्त असे हा ग्रंथ । परी एक लीला सांगत । श्रीगुरुचरित्र अद्भुत। कोणी वर्णो शकेना ।।८।। अमरापूर ग्रामात । श्रीगुरु जाती भिक्षेप्रत । एक ब्राह्मण होता तेथ । दारिद्र्याने गांजलेला ।।९।। घेवड्याचा वेल असत । शेंगा त्यासी बहु लागत । तेणे उदरनिर्वाह



घेवड्याचा वेल श्रीनृसिंहस्वामींनी उपटून टाकला तेथे ब्राह्मणाला गुप्तधन मिळाले.

करीत । ऐसे जीवन चालले ।। १० ।। त्याचे घरी भिक्षेसी जात । तो प्रेमे नेई गृहात । घेवड्याची भाजी वाढीत । तृप्त केले गुरुराया ।। ११ ।। श्री गुरु म्हणती तयाप्रत । तू होशील श्रीमंत । ऐसे म्हणोनी निघत । तेथूनी पुढे जावया ।। १२ ।। गृहाबाहेर येत । घेवड्याचा वेल तोडीत । आणि निघोनी जात । स्वस्थानासी श्री स्वामी ।। १३ ।। कुदळ घेवोनी हातात । ब्राह्मण मूळ खोदू लागत । तव गुप्तधन अकस्मात । त्यासी पाहा हो सापडले ।। १४ ।। धनाचा हंडा मिळत । ब्राह्मण होई श्रीमंत । पिढ्या सात पुरोनी उरत । इतुके धन मिळे त्याते ।। १५।। श्रीदत्त दयावंत । ऐसी लीला दावीत । दारिद्र्य भक्ताचे हरीत । करुणासागर श्रीगुरु ।। १६ ।। संतती, संपत्ती, आरोग्य । विद्या, ज्ञान, वैराग्य । आत्मज्ञान आणि योग। सर्वही मिळे भक्तांना ।।१७।। ऐसे स्थान अद्भुत । निर्माण करिती श्रीदत्त । बारा वर्षे राहोनी तेथ । पुढे जाती अवधारा ।।१८।। पादुका मनोहर स्थापित । त्याची पूजा करा म्हणत । पूर्ण होती मनोरथ । सद्भक्तांचे निश्चये ।।१९।। ऐसे म्हणोनी श्रीदत्त । नृसिंहवाडी सोडोनी जात । गाणगापुरी जाऊनी राहत । भक्तोद्धाराकारणे ।।२०।। तेथेही

लीला अनंत । श्रीगुरु लोका दावीत । त्या सर्व परी संक्षिप्त । पाहू आपण ये ग्रंथी ।। २१ ।।
श्रीदत्तलीलामृत दिव्य ग्रंथ । पठणे पुरती मनोरथ । दत्तावधूत आपुले चित्त । दत्तचरणी वाहतसे ।। २२ ।।

।। अध्याय तिसरा समाप्त ।।

(ओवी संख्या २२)

# ।। अध्याय चौथा ।।

श्रीगणेशाय नमः । हे दत्तात्रेया गुरुवर्या । मजवरी करी तू दया । सद्भक्तांसी सदया । अन्नवस्त्राते देई तू ।। १ ।। तैसेचि देई सद्गुण । देई सद्गुरुदर्शन । करुणामय ज्यांचे जीवन । लोकोद्धारार्थ अवतरले ।। २ ।। असो नृसिंहवाडी सोडून । गुरु येती गाणगापूर स्थान । भीमा अमरजा संगम पाहोन । तप करिती ते त्या स्थळी ।। ३ ।। तेथे महिमा होई अमित । दर्शना येती अनेक भक्त । राजा दर्शनासी येत । संभार सारा घेवोनिया ।। ४ ।। श्रीपाद श्रीवल्लभ अवतारात । रजक एक सेवा करीत । पुनर्जन्मात राजा होत । श्रीगुरु म्हणती तयासी ।। ५ ।। राजाते पूर्वजन्म आठवत । म्हणे श्रींची कुरवपुरात । सेवा केली म्हणोनी या जन्मात । राजा होवोनी जन्मलो ।। ६ ।। जेथे श्रींची स्थाने असत । भूमी राजा दान करीत । औदुंबर नृसिंहवाडीस । ग्रामोत्पन्न दान देतसे ।। ७ ।। तैसेचि गाणगापुरात । विपुल दान राजा देत । ब्राह्मण वस्ती वसवीत । श्रीगुरु सेवा करावया ।। ८।। असो गाणगापुरात । महिमा चंद्रकलेसम वाढत । सिद्धस्थान अद्भुत । प्रसिद्ध आज आहे हो ।। ९ ।। रोगी



'तू राजा होशील' असा आशीर्वाद श्रीपाद श्रीवल्लभांनी धोब्याला दिला होता. तो धोबी पुढील जन्मात मुस्लीम राजा बनून श्रीपाद श्रीवल्लभांचा अवतार श्रीनृसिंहस्वामी सरस्वती यांच्या दर्शनास आला तेव्हा 'काय धोब्या कसा आहेस ?' असा प्रश्न विचारून त्याला पूर्व जन्माची आठवण करून दिली.

आणि व्याधिग्रस्त । तैसेचि विविध समस्याग्रस्त । सेवा करोनी होती मुक्त । ऐसे अद्भुत स्थान ते ।। १० ।। आजही गाणगापूर स्थान । असे दिव्य महिमा संपन्न । लाखो लोक दर्शना कारण । प्रतिवर्षी जाती ते स्थळी ।। ११ ।। प्रभू दत्त त्या स्थानात । वीस वर्षे स्वये राहत । लोककल्याण कारणार्थ । शक्ती तेथे ठेविती ।। १२ ।। यश, कीर्ति, धन, मान । आरोग्य, ज्ञान, समाधान । सिद्धी, तप, साधन । प्राप्त भक्ता होतसे ।। १३ ।। ऐसे अद्भुत स्थान । केले जगदोद्धारार्थ निर्माण । आणि स्वये आपण । कर्दळीवनात गेले ते ।। १४ ।। स्वामी नृसिंह सरस्वती । सर्व भक्ता पाचारिती । कर्दळीवनात जाऊ म्हणती । गुप्त व्हावया कारणे ।। १५ ।। पादुका स्थापिती तेथ । निर्गुण पादुका त्या म्हणत । आणि तेथोनी निघत । नृसिंह स्वामी सरस्वती ।। १६ ।। गाणगापुराहुनी निघत । सांगाती असती चार भक्त । श्रीशैल्य पर्वती येत । मल्लिकार्जुनाते पाहावया ।।१७।। काही दिन तेथे राहत । मग भक्तांसी सांगत । जावे तुम्ही आता परत । कर्दळीवनात जातो मी ।। १८ ।। ऐसे म्हणोनी श्रीदत्त । कृष्णा नदीकिनारी येत । कर्दळी पानावरी बैसत । कृष्णा नदी माझारी ।। १९ ।। आश्चर्ये पाहती भक्त । जलावरी श्रीगुरु तरंगत । पानावरी बैसोनी जात । पैलतीरासी श्रीस्वामी ।। २० ।।

कर्दळीपर्णी बैसोनी । तरंगत जाती कृष्णेमधुनी । पैलतीरा जावोनी । हात दाविती भक्तांना ।। २१ ।।
दोन पावले पुढे जात । आणि पाहा होती गुप्त । ऐसी लीला अद्भुत । भक्त विस्मये पाहती ।। २२ ।।
श्रीदत्तलीलामृत ग्रंथ । चार अध्याय पूर्ण होत । पुढील अध्यायी सांगत । लीला आणिक तुम्हासी ।। २३ ।।

।। अध्याय चौथा समाप्त ।।

(ओवी संख्या २३)

# ।। अध्याय पाचवा ।।

श्रीगणेशाय नम: । दिगंबर मुने बाला । समर्था विश्वस्वामीने । परमहंसा महाशून्या । महेश्वासा महानिधे ।। १।। ॐ हंस हंसाय विद्महे । परमहंसाय धीमहि । तन्नो दत्त प्रचोदयात् ।। २ ।। ॐ शून्य शून्याय विद्महे । परमशून्याय धीमहि । तन्नो परब्रह्म प्रचोदयात् ।। ३ ।। ॐ दत्तात्रेयाय विद्महे । योगीश्वराय धीमहि । तन्नो दत्त प्रचोदयात् ।। ४ ।। औदुंबर, नृसिंहवाडी, गाणगापूर । तीर्थस्थाने मनोहर । निर्मोनी दत्तदिगंबर । कर्दळीवनात गेले ते ।। ५ ।। तीनशे वर्षांपर्यंत । तेथे राहती समाधिस्थ । पुन्हा मागुती उठत । लोकोद्धार करावया ।। ६ ।। छेलाखेडा ग्रामात । दिव्य ज्योत प्रकटत । श्रीस्वामी समर्थ । प्रकट होती तेथवरी ।। ७ ।। आठ वर्षांचे रूपात । स्वामी तेथे प्रकट होत । अनेक लीला दावीत । भक्तोद्धाराकारणे ।। ८ ।। तेथूनी पुढे निघत । हिमालयी संचार करीत । चंचलभारती म्हणत । लोक तेव्हा स्वामींना ।। ९ ।। काही काळ हिमालयात । गुप्तरूपे तप करीत । मग तेथोनिया निघत । दक्षिण दिशेसी श्रीस्वामी ।। १० ।। अनेक तीर्थस्थाने पाहत । मंगळवेढ्यासी येवोनी राहत । ग्रामासमीप



देवमामलेदारांसमोर श्री स्वामी समर्थ प्रकट झाले आहेत.

अरण्यात । होते राहिले श्री स्वामी ।। ११ ।। देव मामलेदार नामे भक्त । ध्यानी स्वामींसी पाहत । मानसपूजा करीत । प्रति दिनी नित्य स्वामींची ।। १२ ।। एकदा असता ध्यान करीत । शालिग्राम त्यासी देत । ठेवी पूजेत नित्य। ऐसे सांगती तयाला ।। १३।। देव मामलेदार मनी म्हणत । कोण हे योगी समर्थ । ध्यानी मजला दिसत । पूजा माझी स्वीकारिती ।। १४ ।। ऐसे मनी चिंतीत । तव स्वामी प्रकट होत । मंगळवेढ्यासी यावे म्हणत । शालिग्रामाते घेवोनिया ।। १५ ।। ऐसी आज्ञा होता त्वरित । शालिग्राम घेवोनि सांगात । देव मामलेदार जात । मंगळवेढा ग्रामासी ।। १६ ।। तेथे जावोनी पुसत । कोणी येथे योगी समर्थ । परी सर्व लोक सांगत । कोणी नाही म्हणोनिया ।। १७ ।। मग एकलेची दूर जात । अरण्यी जावोनी बैसत । ध्यान करो लागत । श्री स्वामींचे तेधवा ।।१८।। शालिग्राम आणला का । ऐसा ध्वनि कानी येत । नेत्र उघडोनी पाहत । समर्थ स्वामी तेधवा ।। १९ ।। पाहता स्वामी समर्थांसी । मिठी घाली चरणांसी । म्हणे दत्तप्रभू आपण येथे । अरण्यात राहता का ।।२०।। चला मजसवे म्हणत । ऐसा भक्त आग्रह करत । तव दत्तप्रभू त्याते म्हणत । श्रोते तुम्ही अवधारा ।। २१ ।। तू जाई तव स्थानात । मी मागाहून येत । अक्कलकोट ग्रामात । वसणे आहे

आम्हासी ।। २२ ।। अक्कलकोट ग्रामी राहीन । लोकोद्धार तेथे करीन । ऐसे कार्य मज लागोन । करणे आहे म्हणोनिया ।। २३ ।। पूर्वजन्मीचा तव योगमार्ग । तोचि दिला तुज प्रत । तू राही आनंदात । सदैव जवळी मी तुझ्या ।। २४ ।। ऐसे सांगोनी स्वामी समर्थ । तेथेंचि पाहा होती गुप्त । देव मामलेदार विस्मित । होवोनी जाती तेधवा ।। २५ ।। तेचि दत्तप्रभू समर्थ । अक्कलकोटी प्रकट होत । अक्कलकोट स्वामी समर्थ । म्हणोनी प्रख्यात होती ते ।। २६ ।। राहुनी प्रज्ञापुरात । तीनशे सिद्ध निर्मित । केवळ वीस वर्षांत । अगाध महिमा जयांचा ।। २७ ।। ऐशा दत्तलीला अद्भुत । श्रवणे पाप ताप जळत। ज्ञान आणि मोक्ष प्राप्त । श्रीगुरुकृपे होतसे ।। २८ ।।

।। अध्याय पाचवा समाप्त ।।

(ओवी संख्या २८)

# ।। अध्याय सहावा ।।

श्रीगणेशाय नमः । श्री सरस्वत्यै नमः । श्री गुरुभ्यो नमः । श्री दत्तलीलामृत । पाच अध्याय संपत । तव म्हणती श्रीस्वामी समर्थ । स्वप्नामाजी येवोनिया ।। १ ।। श्री चिदंबर दीक्षित । अल्लमप्रभू महासिद्ध । श्री ब्रह्मेंद्रस्वामी चरित्र । ग्रंथामाजी वर्णावे ।। २ ।। आज्ञा प्रमाण मानून । सुरू केले पुनर्लिखाण । हे चिदंबरा तू दयाघन । तुझी लीला वदवी तू ।। ३ ।। मार्तंड दीक्षित महाभक्त । गायत्री मंत्र सिद्ध करीत । कठोर तप आचरीत । ईश्वर दर्शनाकारणे ।। ४ ।। ईश्वरी आदेश होत । जाई चिदंबर क्षेत्रात । इच्छिले कार्य सिद्ध होत । तप करिता ते स्थळी ।। ५ ।। श्री चिदंबर महातीर्थ । आकाशलिंग तेथे असत । मार्तंड दीक्षित जात । ईश्वर आज्ञा वंदोनिया ।। ६ ।। षण्मास करिता अनुष्ठान । ईश्वर झाला प्रसन्न । म्हणे मी अवतरेन । उदरी तुझ्या अवधारा ।। ७ ।। लोकोद्धाराकारण । मी स्वये अवतरेन । अनेक लीला करेन । जगदोद्धाराकारणे ।। ८ ।। ऐसे देवोनी



श्री चिदंबर दीक्षित एका भक्ताला मातीची पोटली देत आहेत. नंतर तो भक्त पोटली उघडून पाहतो.
त्या मातीचे सोने झालेले असते.

वरदान । श्री चिदंबर भगवान् । पावले पाहा अंतर्धान । भक्त विस्मित होतसे ।। ९ ।। ग्रामी येई परतोन । भार्येसी सांगे वर्तमान । एक वर्ष होता पूर्ण । अवतार जन्मे दत्ताचा ।। १० ।। तेचि चिदंबर महास्वामी । कीर्ति झाली त्रिभुवनी । यज्ञ याग अन्नदान करोनी । महाख्याती पावले ते ।।११।। दरिद्री होती श्रीमंत । आरोग्य मिळे सर्वांप्रत । कल्पवृक्षासम पुरवीत । सर्व इच्छा भक्तांच्या ।। १२।। नित्य होई अन्नदान। दशसहस्त्र करिती भोजन । जो जे मागे त्या ते देवोन । इच्छा पूर्ण करीतसे ।। १३ ।। आपुल्या बालपणापासोन । ऐशा लीला दावोन । चिदंबर महास्वामी म्हणोन । प्रसिद्ध पाहा होती ते ।। १४ ।। बाल चिदंबर दीक्षित । करण्या जाई पौरोहित्य । गजगौरी असे व्रत । पूजा सांगण्या जातसे ।। १५ ।। स्पर्शता मृत्तिकेचा गज । जिवंत होऊनी फिरू लागत । ऐसी लीला अद्‌भुत । केली चिदंबर स्वामींनी ।। १६।। एकदा श्रीव्यंकटेश । चिदंबर स्वामींसी विनवीत । सव्वा लक्ष रुपये मजप्रत । पाठवावे म्हणोनिया ।। १७ ।। श्री व्यंकटेश इच्छेप्रमाण । तिरुपतीस पाठविती धन । ऐसे अगाध महिमान । देवही ज्यांचा ऋणी होई ।। १८ ।। एक ब्राह्मण दर्शना येत । कृपा करावी म्हणे स्वामीप्रत । दारिद्र्ये गांजलो बहुत । अन्नही न मिळे खावया ।। १९ ।। मृत्तिका बांधोनी त्यासी

देत । घरी जावोनी पाहा म्हणत । ते सर्व सुवर्ण होत । ऐसा महिमा स्वामींचा ।। २० ।। काशीमध्ये प्रकट होत । तेथील ब्राह्मणा दान देत । दशसहस्त्र सात शत । देती मुद्रिका ब्राह्मणांना ।।२१।। दोन महिने तेथे राहत । विपुल अन्नदान करीत । एका ब्राह्मणासी म्हणत । आश्रमी यावे माझ्या तू ।। २२।। तीन मासांनंतर । आश्रमी येई द्विजवर । लोका सांगे समाचार । काशीक्षेत्री वर्तला जो ।।२३।। सर्वा विस्मय वाटत । ते म्हणती द्विजाप्रत। स्वामी येथेचि असत । मागील वर्षापासोनिया ।।२४।। चिदंबर स्वामी म्हणत । ब्राह्मण सत्य सांगत । मी होतो काशीत । तैसेचि येथे होतो मी ।। २५ ।। श्री चिदंबर महास्वामी । समर्थ स्वामी दत्तमुनी । एकची तुम्हा विनवणी । चिदाकाशात मज न्यावे ।।२६।। कल्पवृक्ष स्वामी आपण । करी परम शून्यात विलीन । परमावस्था देवोन । चिदाकाशात मज न्यावे ।। २७ ।। स्मरणगामी श्रीदत्त । चिदंबर स्वामी समर्थ । अनेक लीला करीत । भक्तोद्धाराकारणे ।। २८ ।।

।। अध्याय सहावा समाप्त ।।

(ओवी संख्या २८)

## ।। अध्याय सातवा ।।

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुभ्यो नमः । श्रीचिदंबर दीक्षित । नाना लीला करीत। केंगेरी ग्रामी राहत । लोकोद्धाराकारणे ।।१।। शके सतराशे एकोणतीस । अवर्षण पडे देशात । म्हणोनी सोमयाग करीत । पर्जन्यवृष्टी व्हावया ।। २ ।। ते समयी चिदंबर दीक्षित । अक्कलकोट स्वामीते स्मरीत । यज्ञ व्हावा विघ्नरहित । म्हणोनी प्रार्थिती तयालागी ।। ३ ।। श्री स्वामी समर्थ । ते समयी होते हिमालयात । स्मरताची प्रकट होत । चिदंबरांपाशी तेधवा ।। ४ ।। स्वामीवरी टाकोनी भार । चालला यज्ञसंभार। ब्राह्मण भोजन सहस्त्रावर । प्रतिदिनी पाहा होतसे ।। ५ ।। काही न्यून न पडत । स्वामी समर्थ स्वये पाहत । सान झारी हातात । घेवोनी घृत वाढती ते ।। ६ ।। परी घृत न संपत । तैसेचि इतर अन्नपदार्थ । लक्ष भोजन होई नित्य । ऐसा महिमा चालतसे ।। ७ ।। सोमयागे करोन । अवर्षण गेले निघोन । विपुल पिके धनधान्य । कर्नाटकी तेधवा ।। ८ ।। अक्कलकोट स्वामी समर्थ । श्री चिदंबर दीक्षित । अवधूत निरंजन दत्त । यज्ञमंडपी शोभती ।। ९ ।। विचित्र वर्तले



श्री स्वामी समर्थ एका भक्ताला अरण्यात घेऊन गेले व अनेक सर्प दाखवून हवे तितके घे म्हणाले.
भक्ताने एका सर्पावर पागोटे टाकून तो सर्प उचलला.. स्वामींनी त्याला घरी घेऊन जा म्हणून सांगितले.
घरी जाऊन पाहतो तर सर्पाचे सोने झालेले होते.

तेथ । आचारी पडे आमटीत । भाजूनी होई मृत । क्षणामाजी तेधवा ।। १० ।। श्री चिदंबर दीक्षित । सेवकासी सांगत । श्री स्वामी समर्थ असत । चिंता मुळी करू नका ।। ११ ।। श्री स्वामी समर्थांपासी । आणिती मृत देहासी । कृपाकटाक्षे पाहोनी त्यासी । जिवंत केले स्वामींनी ।। १२ ।। जिवंत झाला ब्राह्मण । नाही भाजल्याचे चिन्ह । ऐसे अगाध महिमान । असे स्वामी समर्थांचे ।। १३ ।। एके दिनी एक भक्त । येई स्वामी दर्शनाप्रत । दारिद्र्ये बहु पीडित । कृपा करा म्हणतसे ।। १४ ।। श्री स्वामी समर्थ । त्यासी नेती अरण्यात । अनेक सर्प दाखवीत । हवे तितुके घे म्हणती ।।१५।। भक्त होई भयभीत । स्वामी त्याते घे म्हणत । पागोटे सर्पांवरी टाकीत । एक उचलोनी घेतसे ।। १६ ।। आता घरी जा म्हणती । तो जाई गृहाप्रती । पागोटे झटके खालती । सुवर्ण पडे तेधवा ।। १७ ।। गेले त्याचे दारिद्र्य । तो झाला श्रीमंत । ऐसा महिमा अगाध । कोणी कैसा वर्णावा ।। १८।। चिदंबर स्थानातून । स्वामी समर्थ करिती प्रयाण । फिरत फिरत येवोन । अक्कलकोटी स्थिरावले ।। १९ ।। हे चिदंबर स्वामी समर्था । दत्तात्रेया अवधूता । शुद्ध करोनी माझिया चित्ता । चिदाकाशात

मज नेई ।।२०।। हे प्रभू दत्तात्रेया। श्रीपाद श्रीवल्लभ सदया । श्री चिदंबर स्वामी समर्था । ग्रंथामाजी राहे तू ।। २१।। पठणे पुरवावे मनोरथ । करी भक्तांसी जीवनमुक्त । आणि परमशून्यात । भक्ता नेई देवा तू ।। २२ ।। जीवनमुक्त अवधूत । ऐशा देई अवस्थेप्रत । दत्तावधूत स्वयंचित्त । समर्थ चरणी वाहतसे ।। २३ ।। श्रीदत्तलीलामृत दिव्य ग्रंथ । दत्तात्रेय राहती येथ । ग्रंथ नव्हे दत्त साक्षात् । शब्दरूपे प्रकटला ।। २४ ।। सातवा अध्याय संपला येथ । श्रीदत्तकृपा अद्‌भुत । पठणे मोक्ष प्राप्त । सोऽहम् ध्याने होतसे ।। २५ ।।

।। अध्याय सातवा समाप्त ।।

(ओवी संख्या २५)

## ।। अध्याय आठवा ।।

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुभ्यो नमः । श्रीदत्तप्रभू समर्थ । लोकोद्धारकारणार्थ । विश्वामाजी प्रकटत । विविधरूपे घेवोनिया ।। १ ।। ते काळी इस्लाम । विश्वी पसरला होता म्हणून । अल्लमप्रभू नाम घेवोन । श्री दत्तप्रभू प्रकटले ।। २ ।। हिंदू आणि मुस्लीम । उभयतांचा भगवान् । हिंदू म्हणती प्रभू आपण । अल्ला म्हणती मुस्लीम ते ।। ३ ।। ऐसे अल्लमप्रभू प्रसिद्ध । कर्नाटकामाजी होत । मुस्लीम दर्गे बांधत । हिंदू बांधती मंदिरे ।। ४ ।। अल्लमप्रभू नामे दर्गे–मंदिरे । बांधती पाहा भक्त सारे । स्वये चन्न बसवेश्वरे । दीक्षा त्यांची घेतली ।। ५ ।। महिमा त्यांचा अगाध । वर्णो न शके शेष–वेद । श्रीदत्त अवतार स्वयंभू । मूळ निर्गुण प्रकटला ।। ६ ।। लक्षावधी जना उद्धरिले । बसवेश्वरासी ज्ञान दिधले । अंती अदृश्य जाहले । श्रीशैल पर्वता माझारी ।। ७ ।। ऐसा महिमा अपार । ब्रह्मादिका अगोचर । अल्लमप्रभूसी नमस्कार । सद्‌भावाने करितो मी ।। ८ ।। हे दत्तप्रभू



श्री अल्लमप्रभूंकडे एक नाथपंथी साधू येतो व आपण वज्रशरीर असल्याचे सांगतो. नंतर त्यांच्या शरीरात तलवार खुपसतो.
तेव्हा त्याला कळते की श्री अल्लमप्रभू वायूशरीराचे आहेत.

समर्था । धरोनी माझिया हस्ता । संक्षिप्त सार तव कथा । तुझी तूच वदवावी ।।९ ।। नाथपंथी एक योगी । तया तेरदळ ग्रामामाजी । अल्लमप्रभूसी म्हणे दावी । योग सामर्थ्य मजला ते ।। १० ।। अल्लमप्रभू त्याते म्हणत । मजपासी नाही सामर्थ्य । माझा स्वामी श्रीदत्त । त्याचे चरणी लीन मी ।। ११ ।। योगी म्हणे मी वज्रदेही । परीक्षा माझी तू पाही । तलवार मोडोनी जाई। ऐसा देह असे माझा ।। १२ ।। ऐसे म्हणोनी सेवकासी । म्हणे चालवी तलवारीसी । खण खण आवाज येई । देहातूनी त्या योग्याच्या ।। १३ ।। वज्रदेह योग्याचा । घाव न लागे तलवारीचा । जयजयकार नावाचा । लोक करिती तेधवा ।। १४ ।। मग म्हणे अल्लमप्रभूते । दाखवी आपुल्या सिद्धीते । तव प्रभू म्हणती योग्याते । चालवी तलवार म्हणोनी ।। १५ ।। अल्लमप्रभू देहावर । सेवक चालवी तलवार । तव ती फिरे आरपार । हवेत जैसी फिरवावी ।। १६ ।। पाहोनी हा चमत्कार । लोक करिती जयजयकार । म्हणती प्रभू निराकार । देहासहित असती हो ।। १७ ।। देह झाला परमशून्य । निराकार निर्गुण ब्रह्म । अल्लमप्रभू चैतन्यघन । साकार झाले म्हणताती ।।१८।। दत्तप्रभू तेची अल्लमप्रभू । निर्गुण निराकार

विभू । स्मरताची आत्मबोधू । प्राप्त होई भक्तांना ।। १९ ।। दत्तलीलामृत दिव्यग्रंथ । पठणे पुरती मनोरथ । श्रीदत्ताची कृपा होत । निर्गुण निराकार जो ।।२०।।

**।। अध्याय आठवा समाप्त ।।**

**(ओवी संख्या २०)**

# ।। अध्याय नववा ।।

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुभ्यो नमः । श्रीदत्तलीलामृत ग्रंथ । कळसाध्याय सुरू होत। श्री दत्त अवतार वर्णनाप्रत । पुरी पडेना पृथ्वी ही ।।१।। समस्त पृथ्वीचा कागद केला । सप्तसागर शाई आणिला । वृक्ष समस्त लेखणी केल्या। तरी लीला संपेना ।।२।। म्हणोनी दावूनी संकेत । दत्तलीला वर्णिल्या येथ । ऐसेपरी पूर्ण होत । दत्तलीलामृत ग्रंथ हा ।।३।। पूर्णावतार, अंशावतार । कलावतार, चित्कलावतार । ऐसे विविध अवतार । आजवरी जाहले दत्ताचे ।। ४ ।। सृष्टी आरंभापासोन । श्रीदत्तात्रेय देव जाण । साकार निराकार राहून । जगदोद्धार करितसे ।। ५ ।। स्वामी समर्थ पूर्णब्रह्म । तीनशे सिद्ध निर्मोन । श्री दत्तात्रेय महिमान । प्रकट केले भूवरी ।। ६ ।। शेगावीचे गजानन । साईबाबा पूर्णब्रह्म । ताजुद्दीन बाबा महिमान । मुख्य शिष्य तयांचे हो ।।७ ।। स्वामीसुत स्वामीकुमर । रामानंद बीडकर । साटम, भालचंद्र, श्रीकृष्ण । ऐसे शिष्य तयांचे हो ।। ८ ।। ऐसे अगाध महिमान । स्वामी समर्थ



चिरूट पेटविण्यासाठी निखारा घेऊन ये असे सांगताच देवी निखारे घेऊन प्रकट झाली.

चिद्‌घन । तुकामाई राघव चैतन्य । ऐसे शिष्य तयांचे हो ।। ९ ।। तयांच्या कृपे करोन । दत्तलीलामृत निर्माण । भाविका ताट भरोन । अमृत पाहा वाढले ।। १० ।। श्रीदत्तरूपे अनंत । त्याचे अवतार अनंत । महिमा त्याचा अनंत । कोणी कैसा वर्णावा ।। ११ ।। परी काही संक्षिप्त । अवतार लीला पाहिल्या येथ । एक चरित्र संक्षिप्त । सांगोनी ग्रंथ संपवितो ।।१२।। ब्रह्मेंद्रस्वामी स्वयंसिद्ध । आंध्र प्रदेशी प्रकटत । अत्री अनुसूयेचा दत्त । ऐसे म्हणती तयाला ।।१३।। पूर्णब्रह्म म्हणूनी ब्रह्मेंद्रस्वामी । ऐसे म्हणती जनी वनी । परी तो दत्तात्रेय अवनी । लोकोद्धारार्थ अवतरला ।।१४।। अनेक लीला त्यांनी केल्या । देवता सेविती चरणाला । अगाध महिमा दाविला । लोकोद्धाराकारणे ।।१५।। जलदीप केले प्रज्वलित । मांसाची फळे करीत। त्रिकालज्ञान लिहीत । अद्‌भुत दिव्य ग्रंथ जो ।।१६।। हिंदू, मुस्लीम भक्त झाले । निजामासी शरण आणिले । समाधीनंतरही भेटले । अनेक भक्ता प्रत्यक्ष ।। १७ ।। देवी मंदिराचे काम चालत। वर्गणी मागती ग्रामस्थ । परी स्वामी काही न देत । उगेची राहती बैसोनिया ।।१८।। चिरूट पिण्याची आली लहर । कोणी न देई अंगार । देवीसी म्हणती

सत्वर । निखारा घेवोनी येई तू ।। १९ ।। ऐसे म्हणता सर्वांसमक्ष । देवी तेथे प्रकटत । ब्रह्मेंद्रस्वामींसी अंगार देत । आणि नमन करीतसे ।। २० ।। पाहोनी हा चमत्कार । सर्व करिती नमस्कार । म्हणती स्वामी तू थोर । अगाध महिमा तुझा देवा ।। २१ ।। पंधराव्या शतकात । ब्रह्मेंद्रस्वामी श्रीदत्त । ऐशा लीला करीत । आंध्र प्रदेशी होते ते ।। २२ ।। दोनशे वर्षे राहत । नंतर संजीवन समाधीत । आजही लीला होत । ऐसा महिमा तयांचा ।। २३ ।। ऐशापरी श्रीदत्त । सदैव राहती लीला करीत । कुठे शिर्डी साईनाथ । कुठे ब्रह्मेंद्र स्वामी ते ।। २४ ।। कुठे स्वामी समर्थ । माणिक प्रभू कुठे नांदत । ताजुद्दीन अनंगदेव होत। विविधरूपे राहती ते ।। २५ ।। कुठे स्वामी शंकर । कुठे श्रीपाद गुरुवर । कुठे काडसिद्धेश्वर । बालमुकुंद कुठे होती ।। २६।। ऐशा लीला अनंत । येथे पाहिल्या संक्षिप्त । दत्तावधूत लीन होत । सद्गुरु चरणी सर्वदा ।।२७ ।। स्वस्ती श्रीदत्तलीलामृत । ग्रंथ येथे पूर्ण होत । सद्भाविकांचे मनोरथ । पूर्ण होती निश्चये ।। २८ ।। देवतांची कृपा होत । सिद्धांची दर्शने होत । परमार्थी प्रगती होत । पठणे नित्य ग्रंथाच्या ।। २९ ।। अडली कामे पूर्ण होत । संसार कष्ट दूर होत । सद्भाविकांसी मोक्ष

प्राप्त । ग्रंथ पठणे होतसे ।। ३० ।। श्रीदत्तलीलामृत सिद्धग्रंथ । सिद्धहस्ते लिहिला जात । लोकोद्धारार्थ श्रीदत्त । स्वये निर्माण करीतसे ।। ३१ ।।

।। अध्याय नववा समाप्त ।।

(ओवी संख्या ३१)

(एकूण ओवी संख्या २२३)

।। श्रीदत्तलीलामृत संपूर्णम् ।।



श्री हेडाखान बाबा

श्री दत्तावधूत विरचित

# ॥ श्रीसिद्धलीलामृत ॥

॥ दोन शब्द ॥

## ॥ श्रीसिद्धलीलामृत ॥

**श्रीसिद्धलीलामृत** या दिव्य ग्रंथाची निर्मिती एका अलौकिक प्रसंगामुळे झाली. श्री स्वामी दत्तावधूत हिमालयातील दुर्गम भागामध्ये फिरत असताना सितलाखेत येथे महाअवतार बाबा, मुनिंद्र भगवान् यांनी हा छोटासा ग्रंथ लिहिण्याची आज्ञा केली.

या छोट्याशा परंतु दिव्य ग्रंथामध्ये हिमालयातील अमर महासिद्धांचे ऐश्वर्य वर्णन केलेले आहे.

**– प्रकाशक**

## ।। अध्याय पहिला ।।

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुभ्यो नमः । ॐ नमो सर्व सिद्धाय स्वाहा । देवतात्मा हिमालय । ऋषिमुनींचे आश्रयस्थान । अनेक युगापासोन । तप करिती ऋषी जेथे ।। १ ।। देह ज्यांचे चैतन्य । कैवल्याचे जे खाण । मूर्तिमंत परमेश्वर सगुण । समाधी लावूनी बैसला ।। २ ।। ऐसे योगी– महायोगी । अनेक असती त्या जागी । कैलास कौशिक पर्वतभागी । दर्शन त्यांचे होतसे ।। ३ ।। त्यातील एक महायोगी । महाअवतार बाबा कल्प जोगी । कीर्ति पावोनी या जगी । गुप्तरूपे राहती ते ।। ४ ।। अमर महात्मा परमसिद्ध । आयु न कळे कोणाप्रत । हिमालयामाजी फिरत । कधी प्रकट गुप्तरूपे ।। ५ ।। कधी सोळा वर्षांचे दिसती । कधी तीस वर्षांचे दिसती । दाढी मिशा कधी असती । कधी सुकुमार दिसती ते ।। ६ ।। कोणी म्हणती हा शंकर । कोणी म्हणती सनतकुमार। कोणी म्हणती ईश्वर । याहून दुजा असेचिना ।। ७ ।। महाअवतार बाबा परम समर्थ। विश्वोद्धारार्थ सदैव झटत । त्यांचे कार्य



श्री महाअवतार बाबाजी लाहिरी महाशयांना क्रियायोगाची दिक्षा देऊन त्यांचे आज्ञाचक्र जागृत करत आहेत.

थोडक्यात । सांगे दत्त तुम्हा येथे ।। ८ ।। श्यामाचरण लाहिरी म्हणोनी । योग भ्रष्ट आत्मा जन्मोनी । प्रकट केले बाबा लागोनी । कथा तीच अवधारा ।। ९ ।। नोकरी करी रेल्वेत । बदली होई राणीखेत । तेथूनी द्वाराहाटपर्यंत । कामासाठी जातसे ।। १० ।। हिमालयी फिरावे म्हणोनी । जाती पाहा एक दिनी । महाअवतार बाबा प्रकटोनी । दर्शन देती तयालागी ।। ११ ।। दर्शन देवोनी सांगती । तू पूर्वीचा योग भ्रष्ट यती । गुहा त्याची दाविती । ध्यान पूर्वी जिथे केले ।। १२ ।। कृपास्पर्श स्वामींचा होत । पूर्वजन्म सर्व आठवीत । चरणी माथा ठेवीत । कृपा करावी म्हणोनिया ।। १३ ।। क्रियायोगाची दीक्षा देती । म्हणती सांगे लोकांप्रती । करावे या साधनेप्रती । मोक्षमार्गाते पावावया ।। १४ ।। ऐसे सांगोनी भक्ताप्रत । महाअवतार बाबा गुप्त होत । ऐसे लीला विग्रही समर्थ । असती महाअवतार बाबा हो ।। १५ ।। दीक्षा देवोनी लाहिरीप्रती । परमसमर्थ गुप्त होती । श्यामाचरण लाहिरी करिती । प्रसार क्रियायोगाचा ।। १६ ।। नामरूपातीत कल्प जोगी । तया महाअवतार बाबाजी । लाहिरी महाशय देती । नाम ऐसे प्रेमाने ।। १७ ।। क्रियायोगाचे सिद्धसाधक । लाहिरी महाशय

तयार करीत । ऐसे परी प्रसार होत । क्रियायोगाचा जगामाजी ।। १८ ।। प्रणवानंद, केवलानंद । युक्तेश्वर शिष्य योगानंद । ऐसे अनेक शिष्यवृंद । प्रचार करिती योगाचा।। १९ ।। तप, स्वाध्याय, ईश्वरप्रणिधान । हे योगाचे मूळ कारण। प्राणायाम, धारणा, ध्यान । समाधी सिद्ध होतसे ।। २० ।। विश्वोद्धाराकारण । कष्टे स्वये नारायण । विविध रूपे घेवोन । सन्मार्ग जना दावीतसे ।। २१ ।। श्रीसिद्धलीलामृत दिव्य ग्रंथ । प्रथम अध्याय संपला येथ । श्री दत्तावधूत आपुले चित्त । सद्‌गुरु चरणी वाहतसे ।। २२ ।।

।। अध्याय पहिला समाप्त ।।

(ओवी संख्या २२)

## ।। अध्याय दुसरा ।।

श्री गणेशाय नम: । नमस्ते शारदे देवी । ॐ वद वद वाग्वादिनी । नीलसरस्वती मयूरवाहनी । सिद्धलीला वदवी तू ।। १ ।। महाअवतार बाबा समर्थ । ऐसे परी प्रकट होत । ज्ञानगंगा प्रवाह सोडीत । जगदोद्धाराकारणे ।। २ ।। दर्शन देवोनि लाहिरी प्रती । महाअवतार बाबा गुप्त होती । पुन्हा कैसे प्रकटती । भक्तजन हो अवधारा ।। ३ ।। कूर्माचल हिमालयात । हेडाखान ग्राम असत । तेथील जन देखत । अति अद्‌भुत परियेसा ।। ४ ।। नदी किनारी बसले असती। प्रकटे तेथे एक ज्योति । ज्योतितुनी साकार होती । महाअवतार बाबा तेथे हो ।। ५ ।। ग्रामस्थ होती विस्मित । साष्टांग नमस्कार करीत । मुनिंद्र भगवान् म्हणोनी होत । प्रसिद्ध जाणा तेथे हो ।। ६ ।। तेथेची एका गुहेत । श्री स्वामी राहो लागत । दीन जनां उद्धरीत । अनेक लीला करोनिया ।। ७ ।। कधी बैसती अग्नित । तीन-तीन मासांपर्यंत । अग्नितूनी जव बाहेर येत । भक्तां विस्मय होतसे ।। ८ ।। स्वामी देहावरील वस्त्र । तेही अग्नि जाळो न शकत । जलधारा



श्री महाअवतार बाबाजी आपल्या भक्ताला घेऊन आकाशमार्गे जात आहेत.

बाहेर येत । वस्त्रातूनी श्री स्वामींच्या ।। ९ ।। कधी बैसती नदीत । वरोनी जल वाहत । परी जव बाहेर येत । देह कोरडा राहतसे ।। १० ।। ऐसे प्रकार अद्‌भुत । पाहती स्वामींचे भक्त । म्हणती ईश्वर साक्षात्‌ । आम्हा लागी भेटला ।। ११ ।। गुमानी नामे परम भक्त । श्री स्वामी सेवा करीत । राहे स्वामी समवेत । अनेक लीला पाहतसे ।। १२ ।। एकदा स्वामी त्याते म्हणत । मी गंगास्नानाते जात । तू राही येथ प्रत । जावोनी त्वरित येतो मी ।। १३ ।। गुमानी म्हणे स्वामीप्रत । गंगा साठ मैल दूर असत । कैसे जात तेथ प्रत । काही साधन असेना ।। १४ ।। स्वामी तयासी म्हणती । तूही चल सांगाती । ऐसे म्हणोनी हात धरिती । आकाशमार्गे जाती ते ।। १५ ।। घेवोनी भक्तासी सांगाती । स्वामी आकाशमार्गे जाती । गंगाकिनारी उतरती । स्नान करिती दोघेही ।। १६ ।। गंगास्नान करोन । पुन्हा करिती आकाशगमन । हैडाखान ग्रामी येवोन । भक्ता दर्शन देती ते ।। १७ ।। एका तासाचे आत । एकशेवीस मैल प्रवास करीत। मुनिंद्र भगवान्‌ दावीत । लीला आपुल्या भक्तासी ।। १८ ।। ऐशा अनेक लीला । हैडाखान ग्रामी जाहल्या । महाअवतार बाबांनी केल्या । भक्तोद्धाराकारणे ।। १९ ।।

श्रीसिद्धलीलामृत । द्वितीयोध्याय संपला येथ । मुनिंद्र भगवान् नामे प्रकटत । हैडाखान ग्रामी स्वामी हो ।। २० ।।

### ।। अध्याय दुसरा समाप्त ।।
### (ओवी संख्या २०)

## ।। अध्याय तिसरा ।।

श्रीगणेशाय नमः । गुमानी बाबांचा परम भक्त । अनेक लीला पाहत । स्वामी चरणी त्याचे चित्त । लीन होते जाहले ।। १ ।। उभयता हिमालयी फिरत । सद्भक्तांसी दर्शन देत । योग्यांसी महायोग देत । नाना लीला करिती ते ।। २ ।। कधी भक्ता उपदेश देती । चित्त शुद्ध करा म्हणती। परोपकार प्रेम सर्वांभूती । दयाळूपणे वर्तावे ।। ३ ।। जितुके शुद्ध अंतःकरण । जवळी येई नारायण। सहज ऐसे बोलून । उपदेश देती भक्तांना ।। ४ ।। मुनिंद्र भगवान् आणि भक्त । हिमालयी होते फिरत। बद्रिनारायण मार्गात । भक्त आजारी पडतसे ।। ५ ।। अत्यवस्थ होई भक्त । दिसो लागती यमदूत । तेव्हा महाअवतार बाबा समर्थ । म्हणती पाहा भक्तांसी ।। ६ ।। तुझ्याऐवजी मी मरेन । तू होशील बरा पूर्ण । ऐसे म्हणोनी भगवान् । व्याधि ओढोनी घेती ते ।। ७ ।। भक्त झाला ठणठणीत । बाबा होती व्याधिग्रस्त । आणि भक्तांते सांगत । उद्या मरेन म्हणोनिया ।। ८ ।। स्वामी म्हणती भक्तांप्रत । मरेन उद्या मी निश्चित । दाहक्रिया करोनी



बद्रीनाथ मार्गामध्ये कर्णप्रयाग येथे गुमानी भक्ताची व्याधी स्वतःवर ओढवून घेऊन श्री महाअवतार बाबाजींनी देह सोडला. त्यांच्या देहाला अग्नि देऊन भक्त परत आपल्या गावाकडे चालत निघाला. दोनशे कि. मी दूर अल्मोड्याला एक महिन्यानंतर पोहोचला. श्री महाअवतार बाबाजींना तेथे जिवंत पाहून आनंदीत झाला.

गंगेत । राख माझी सोडावी ।। ९ ।। भक्त होई दु:खित। स्वामी त्याते समजावीत । मी संन्यासी मजप्रत । नाही मागे–पुढे कोणी ।। १० ।। तरी न व्हावे दु:खित । दाहक्रिया करी त्वरित । ऐसे भक्ता सांगत । मुनिंद्र देव तेधवा ।। ११ ।। दुसरे दिनी पाहत । प्राण गेलेला असत । दाहक्रिया करोनी भक्त । राख गंगेत टाकीतसे ।। १२ ।। इतुके सर्व करोन । आपुले ग्रामी येवोन । अति दु:खे वर्तमान । सर्वां सांगो लागतसे ।। १३ ।। सर्व होऊनी विस्मित । त्याचे मुखाकडे पाहत । वेड लागले का तुजप्रत । म्हणोनी पुसती तयालागी ।। १४ ।। तो म्हणे मी सांगतो सत्य । बाबा नाही जिवंत । स्वहस्ते दाहक्रिया करोनी येथ । आलो तुम्हासी सांगावया ।। १५ ।। दाहक्रिया मी स्वत: केली । राख गंगेत सोडली । आणि तेथूनी लवलाही । निघालो ग्रामासी यावया ।। १६ ।। पूर्ण एक मास चालत । प्रवास करोनी आलो येथ । आणि तुम्ही वेडा म्हणत । मजला का ते समजेना ।। १७ ।। श्रोते द्यावे अवधान । पूर्वी नव्हते प्रवास साधन । त्या काळचे हे वर्णन । लक्ष देवोनी अवधारा ।। १८ ।। बद्रिनारायण मार्गात । बाबा कलेवर सोडत । तेथूनी भक्त चालत । अल्मोड्यासी पोहोचला ।। १९ ।। या

त्याच्या प्रवासास । एक मासाहूनी काळ लागत । लोकांसी जव सांगत । लोक म्हणती वेडा तू ।। २० ।। लोक म्हणती तयाप्रत । शांत करी तू आपुले चित्त । बाबा येथेंचि असत । समीप ग्रामा माझारी ।। २१ ।। अल्मोड्या समीप ग्राम । तेथे मुनिंद्र भगवान् । राहती मागील मास दोन । ऐकोनी विस्मित होतसे ।। २२ ।। विस्मित होवोनी भक्त । त्या ग्रामी जाई धावत । पाहोनी ईश्वरा तेथ । परमानंदी डोलतसे ।। २३ ।। म्हणे मुनिंद्र भगवान् । देवाचेही देव आपण । तू साक्षात् नारायण । कोण लीला जाणो शके ।। २४ ।। किती विचित्र लीला केली । मृत्यू माया दाखविली । अगाध लीला पाहिली । ऐसे म्हणे तेधवा ।। २५ ।। लीला अवतारी भगवान् । अनेक लीला करोन । भक्तांसी मोक्ष सोपान । प्रेमभराने दावीतसे ।। २६ ।। जैसा भाव तैसा देव । हा येथींचा अनुभव । खऱ्या भक्तासी अभिनव । लीला मिळती पाहावया ।। २७ ।। ज्याचे शुद्ध अंत:करण । भक्ती प्रेमाने गेले भरोन । त्याचे स्वाधीन होऊन । देव लीला दावीतसे ।। २८ ।। गुमानी श्रींचा परम भक्त । अनेक लीला देखत । स्वत:चे गृही निर्मित । एक गुप्त गुहा तेथे ।। २९ ।। कधी भक्तांचे घरी जात । गुहेमाजी ध्यान

करीत । एक चिमटा ठेवीत । स्वामी जाणा ते स्थळी ।। ३० ।। ऐसा भक्त भगवान् । रूप नर–नारायण । जगा संदेश देण्या लागोन । भूवरी जाणा येती ते ।। ३१ ।। लीलाधारी भगवंत । जगदोद्धारा प्रीत्यर्थ । नाना लीला दावीत । भक्ती मार्गाते लावावया ।। ३२ ।। महाअवतार बाबा समर्थ । आजही राहती हिमालयात । ते अजर अमर संत । लोकांकारणे राहती ते ।। ३३ ।। तृतीय अध्याय संपला येथ । लीला विचित्र दावीत । दत्तावधूत आपुले चित्त । स्वामी चरणी वाहतसे ।। ३४ ।।

।। अध्याय तिसरा समाप्त ।।

(ओवी संख्या ३४)

# ।। अध्याय चौथा ।।

श्री गणेशाय नमः । नमस्ते शारदे देवी । सरस्वती मतीप्रदे । वसत्वं मम जिव्हाग्रे । सर्वविद्याप्रदा भव ।। १ ।। सरस्वती नमस्तुभ्यं । वरदे कामरूपिणी । विद्यारंभं करिष्यामि । सिद्धीर्भवतु मे सदा ।। २ ।। महाअवतार बाबा समर्थ । क्रियायोग प्रकट करीत । हिमालयी राहोनी गुप्त । वरदान देती भक्तांना ।। ३ ।। श्रद्धेने जो स्मरण करीत । त्यावरी तात्काळ कृपा करत । मोक्षमार्गाते लावीत । ऐसा महिमा तयांचा ।। ४ ।। योगानंदाते देवोनी दर्शन । म्हणती परदेशी जा म्हणोन । त्यांनी गुरुआज्ञेप्रमाण । कार्य त्यांचे केले हो ।। ५ ।। कधी प्रकट कधी गुप्त । ऐसे त्यांचे कार्य चालत । महाअवतार बाबा समर्थ । आजही राहती हिमालयी ।। ६ ।। विनम्रतेने करिता स्मरण । देती अनुभव विलक्षण । परमार्थ उघड करोन । भक्तालागी देती ते ।। ७ ।। एकदा एका शिष्याप्रती । श्री लाहिरी महाशय म्हणती । दशाश्वमेध घाटावरती । जावोनी ध्यान करी तेथे ।। ८ ।। आज्ञेप्रमाणे भक्त । दशाश्वमेध घाटावर जात । ध्यान करू जव लागत । पाहे विचित्र तेधवा ।। ९ ।। तेजाचे गोल तीन। तेथे येती गगनामधून । भक्त नयन विस्फारोन । अद्भुत प्रकार पाहतसे ।। १०।। महाअवतार बाबा



ज्योतितून श्री महाअवतार बाबा व श्री लाहिरी महाशय प्रकट झाले.

समर्थ । लाहिरी महाशय प्रकटत । तृतीय गोलामधून प्रकटत । एक दिव्य देवता ती ।।११।। त्या नवदुर्गा देवी प्रत । महाअवतार बाबा म्हणत । विलीन व्हावे चैतन्यात । ऐसे मजला वाटतसे ।। १२।। तव ती देवी म्हणत । आपण चैतन्य देहासहित । तरी लोकोद्धारार्थ । चैतन्य देह असो द्यावा ।। १३।। तथास्तु म्हणती समर्थ । तिघेही अदृश्य होत । सारा प्रकार पाहे भक्त । विस्मयाने तेधवा ।। १४ ।। येवोनिया गुरुपाशी । सर्व सांगे तयासी । लाहिरी महाशय तत्क्षणेसी । वदते झाले परियेसा ।। १५।। महाअवतार बाबा समर्थ । देह जयांचा शाश्वत । कल्पांतापर्यंत । सदेहाने राहती ते ।। १६ ।। हे कळावे लोकांप्रत । म्हणूनी तुज साक्षी करीत । ऐशा लीला अद्‌भुत । कोणी कैशा वर्णाव्या ।।१७।। राहेन कल्पांतापर्यंत । सदेहाने कार्य करत । ऐसे वचन बाबा देत । श्री नवदुर्गा देवीते ।।१८।। असो स्वस्ती श्री समर्थ । अजर अमर कल्पसिद्ध । महाअवतार बाबा राहत । हिमालयामाझारी ।।१९।। चौथा अध्याय संपला येथ । परी भक्तां आनंद बहुत । हिमालयी राहे श्री दत्त । जग रक्षाया कारणे ।।२०।।

।। अध्याय चौथा समाप्त ।।

(ओवी संख्या २०)

# ।। अध्याय पाचवा ।।

श्रीगणेशाय नमः । महाअवतार बाबा समर्थ । कधी प्रकट कधी गुप्त । राहोनी विश्व कल्याणार्थ । अगाध लीला करिती ते ।। १ ।। राम ठाकूर बालवयात । कामाख्या देवी दर्शनाप्रत । नीलांचल पर्वती जात । गोहत्ती समीप जो असे ।। २ ।। महाअवतार बाबा समर्थ । अनंगदेव रूपे प्रकटत । जीवन्मुक्त सिद्ध मंडळी समवेत । दर्शन देती बालका ।। ३ ।। बालकाते देवोनी दर्शन । मस्तकी स्पर्शती चरण । तात्काळ अदृश्य होऊन । राम ठाकूर जाती ते ।। ४ ।। द्वादश वर्षांपासून । गुरुसहित गुप्त होऊन । चाळीस वर्षांपर्यंत । गुरुसहित राहती ते ।। ५ ।। सिद्धमंडळी समवेत । हिमालयामाजी फिरत । परी कोणाही न दिसत । अदृश्यरूपे राहती ते ।। ६ ।। प्रवास करण्याचे येता मनात । डेरा डंडा उठाव म्हणत । सर्व मंडळी अदृश्य होत । आकाशमार्गी जाती ते ।। ७ ।। अनंगदेव नामे ख्यात ।



राम ठाकूर यांना श्री महाअवतार बाबाजींनी प्राचीन कालीन ऋषींचे दर्शन घडविले.

महाअवतार बाबा तेथे असत । महाअवतार बाबा नाम होत । योगीकथामृतामाझारी ।। ८ ।। नामरूपातीत अनंत । अनंगदेव मूळ असत । त्यांसीच महाअवतार बाबा म्हणत । भक्तजन ते प्रेमाने ।। ९ ।। अनंगदेव परमसिद्ध । जेव्हा भक्तांसी दीक्षा देत । परिवर्तन होई देहात । देह अदृश्य होतसे ।। १० ।। हिमालयातील आश्रम गुप्त । राम ठाकुरासी दावीत । कल्प कल्प वर्षे तप करीत । ऋषी तेथे बैसले ।। ११ ।। राम ठाकूर भाग्यवंत । गुरु भेटे परम समर्थ । हिमालयामाजी फिरत । सिद्धांसवे असती ते ।। १२ ।। ऐसेचि एकदा पुसत । काय करावे आहे मनात । राम ठाकूर उत्तर देत । जे होई ते पाहे मी ।। १३ ।। स्पर्श करोनी बैस म्हणती । राम ठाकूर तैसे करिती । समाधी आणि अदृश्य स्थिती । होऊनी पाहा जातसे ।। १४ ।। राम ठाकूर समाधिमग्न । छत्तीस वर्षे गेली निघोन । मग अनंगदेव येवोन । जागृत केले तयांना ।। १५ ।। भिन्न स्थळ भिन्न प्रदेश । पाहोनी राम विस्मित । म्हणे हे कैसे होत । ते मज सांगा गुरुराया ।। १६ ।। ज्या जागी मी समाधीत । बैसलो ती ही न होत । आलो कैसा येथप्रत । हेचि मजला समजेना ।। १७ ।। अनंगदेव तया म्हणत । मी आणिले तुज येथ । समाधिस्थ तव देहाप्रत ।

अनेक स्थानी ठेविले ।। १८ ।। ऐसे अनंगदेव समर्थ । तेचि महाअवतार बाबा होत । तयांचे चरणी नतमस्तक । दत्त सदैव होतसे ।। १९ ।। श्रीसिद्धलीलामृत दिव्य ग्रंथ । पठणे पुरती मनोरथ । अमर सिद्धांची कृपा होत । हिमालयात असती जे ।। २० ।। असो संपला ग्रंथ । सिद्धलीला वर्णिल्या येथ । दत्तावधूत आपुले चित्त । सिद्ध चरणी वाहतसे ।। २१ ।।

।। अध्याय पाचवा समाप्त ।।

(ओवी संख्या २१)

(एकूण ओवी संख्या ११७)

।। श्रीसिद्धलीलामृत संपूर्णम् ।।



श्री महाअवतार बाबाजी हजारो वर्षांपासून आजही हिमालयात गुप्तपणे रहात आहेत व योग्यांना मार्गदर्शन करत आहेत.